स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३ (प्रतिनिधी) : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या पाच वर्षाच्या कालावधीकरीता कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नव्याने होऊ घातलेल्या बृहत आराखड्याच्या अनुषंगाने तीन जिल्ह्यातील शिक्षणप्रेमींकडून १५ एप्रिलपर्यंत सूचना मागवण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शासनाने ३१ मार्च रोजी झालेल्या ऑनलाईन सभेत पाच वर्षाच्या कालावधीकरीता तयार होणा-या बृहत आराखड्यासाठी थेट सूचना मागवल्या आहेत. सूचना मागविणेसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासनाने दिलेली लिंक http://wahgi.ncog.gov.in/MaharashtraEducation/Mhedu1/SuggestionFormwww.nmu.ac.in येथे उपलब्ध आहे. तरी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी अंतर्गत असलेल्या जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य/संचालक, पालक, शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय क्षेत्रातील मान्यवर आणि शिक्षणतज्ज्ञ इत्यादींनी आपल्या सूचना ह्या दि. १५ एप्रिल २०२३ पर्यंत वर दिलेल्या वेबलिंक फॉर्ममध्ये भरून शासनास पाठवाव्यात असे विद्यापीठाच्यावतीने प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी कळविले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: ३ एप्रिल, २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी